# डेक्कन मर्चंट्स बँकेत फ्रँकिंग सेवा

**मुंबई** – डेक्कन मर्चंट्स बँकेच्या भायखळा आणि दादर शाखेमध्ये फ्रँकिंग सेवा नुकतीच सुरू करण्यात आली. बँकेचे अध्यक्ष काशिनाथ मोरे यांच्या हस्ते ग्राहकांच्या दस्तावेजावर मुद्रांकन करून या सेवेस प्रारंभ करण्यात आला. या वेळी उपाध्यक्ष विनोदकुमार कच्छारा, सरव्यवस्थापक शशिकांत अभंग तसेच बँकेचे संचालक सदस्य, अधिकारी, कर्मचारी वर्ग आणि ग्राहकवर्ग उपस्थित होता. बँकेच्या ठाणे शाखेतही ही सेवा लवकरच उपलब्ध करण्यात येणार आहे.